<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>

माझे नांव:-पंकज शिवाजीराव शेळके, **वय:-** ३८ वर्षे,

व्यवसाय:- नोकरी, **रा.** अहमदपूर.

<u>सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कांबळे यांच्यामार्फत सुरु.</u>

०१. मी अहमदपूर पंचायत समितीमध्ये जून २०२५ पासून गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहे. त्यापुर्वी मी गटविकास अधिकारी, पंचायत समिती वेल्हे, जि. पुणे येथे कार्यरत होतो. मला साक्षीसमन्स आहे. उपलब्ध सर्व कागदपत्रे मी या प्रकरणी मुळ स्वरुपात आणलेली आहेत. त्याची सत्यप्रत मी याकामी दाखल करीत आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे.

०२. या सर्व कागदपत्रांचा ताबा आमच्या कार्यालयाचा आहे. आता मला नि.क्र.१२६/१ हा कागद दाखवला. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीचा माहितीच्या अधिकारातील अहवाल त्यांनी द्यावा, म्हणून केलेला अर्ज आहे. त्यावर मुळ स्वरुपातील सही आहे. दि.१३/०१/२०११ रोजी सदर अर्ज आमच्या कार्यालयाने स्वीकारल्याबद्दल पोहच आहे. त्यास **<u>नि.क्र.१२८</u>** देण्यात येते.

०३. आता मला नि.क्र.१२६/२ हा कागद दाखवला. त्यात वादी यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांना प्रोसीडींग परत न केल्याबद्दल कार्यवाही होण्यासाठीचा विनंती अर्ज आहे व त्याची आम्हाला आलेली प्रत आहे. दि.०६/०७/२००९ रोजी पंचायत समिती अहमदपूर यांना ही प्रत मिळाली. त्यावर आवक-जावक कारकुनाची सही आहे व कार्यालयाचा शिक्का आहे. त्यास **<u>नि.क्र.१२९</u>** देण्यात येते.

०४. आता मला नि.क्र.१२६/३ हा कागद दाखवला. तो वादी यांनी गटविकास अधिकारी, अहमदपूर यांना माहितीच्या अधिकारात दि.३०/०४/२००७ रोजीचा अर्ज असून तो आमच्या कार्यालयाला मिळालेला आहे. त्यावर श्री. आरसुडे योग्य कार्यवाही करण्यात यावी असा आदेश आहे. त्यास **<u>नि.क्र.१३०</u>** देण्यात येते.

०५. आता मला नि.क्र.१२६/४ हा कागद दाखवला. तो गटविकास अधिकारी, अहमदपूर यांच्याकडे वादीने केलेला अर्ज आहे. प्रतिवादी यांनी जाणिवपुर्वक वादीची घरपट्टी निरंक दाखविल्याने त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी असा त्याचा थोडक्यात मसुदा आहे. तो कागद आमच्या कार्यालयात दि.१४/०३/२००७ रोजी मिळाला व त्यावर तशी पोहच आहे. त्यास **नि.क्र.१३१** देण्यात येते.

०६. आता मला नि.क्र.१२६/५ हा कागद दाखवला. तो वादीने आमच्याकडे माहितीच्या अधिकारात दिलेला अर्ज असून मुळकी ग्रामपंचायतीच्या अभिलेखात प्रतिवादींनी फेरफार केला म्हणून आणि खोटी प्रोसीडींग बनवली या अनुषंगाने तक्रार आहे. तो कागद आमच्या कार्यालयात दि.११/०७/२००८ रोजी मिळाला. त्यास **नि.क्र.१३२** देण्यात येते.

०७. आता मला नि.क्र.१२६/६ हा कागद दाखवला. तो फुलाबाई शिवाजी लोहारे यांनी गटविकास अधिकारी, अहमदपूर यांना केलेला अर्ज आहे. दि.२२/०६/२००६ रोजी झालेल्या जबाबाची प्रत मिळावी असा त्यातील मसुदा आहे. तो कागद आमच्या कार्यालयास दि.१७/०८/२००६ रोजी मिळाला. त्यास **नि.क्र.१३३** देण्यात येते.

०८. आता मला नि.क्र.१२६/७ हा कागद दाखवला. तो माहितीच्या अधिकारातील आम्हाला वादीने दिलेला अर्ज असून अतिक्रमण व इतर प्रकरणांची माहिती त्यात मागितली आहे. तो अर्ज आमच्या कार्यालयात दि.३०/०३/२००७ रोजी प्राप्त झाला. त्यावर आमच्या कार्यालयाच्या कारकुनाची सही आहे. त्यास **नि.क्र.१३४** देण्यात येते.

०९. आता मला नि.क्र.१२६/८ हा कागद दाखवला. तो वादीने दिला असून खोटे व बनावट ८-अ रजिस्टर बनवण्याबाबतचा आक्षेप त्या अर्जात आहे. ती प्रत आमच्या कार्यालयाला मिळाली. त्यावर

कार्यालयाच्या कारकुनाची सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र.१३५** देण्यात येते.

१०. आता मला नि.क्र.१२६/९ हा कागद दाखवला. तो प्रोसीडींग बुक उपलब्ध करुन द्यावे म्हणून दि.१८/०१/२००७ रोजीचा अर्ज आहे. तो आम्हाला उद्देशून केलेला आहे. तो वादीने दिलेला आहे. त्यावर एक सही आहे. आमच्या कार्यालयाला मिळाल्याबद्दल त्यावर नोंद आहे. त्यास **नि.क्र.१३६** देण्यात येते.

११. या अर्जाप्रमाणे आमच्या कार्यालयाने निश्चितपणाने वादीला माहिती पुरवली का याबद्दल मला सांगता येणार नाही. माहिती न पुरवल्याने काही अपीले झाली का याबद्दल मला सांगता येणार नाही. वादीच्या तक्रारींच्या अनुषंगाने जी संचिका आमच्या कार्यालयात उपलब्ध आहे, ती संबंध मी आजरोजी सोबत आणली आहे. याशिवाय आमच्या कार्यालयात वादीच्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणताही दस्तावेज नाही. प्रतिवादींच्याविरुध्द आमच्या कार्यालयाने वादीच्या तक्रारींच्या किंवा अर्जांच्या आधारे गुन्हा नोंद केलेला नाही.

सरतपास पुर्ण.

उलटतपास वादीतर्फे श्री.एस.बी.फड वकील यांच्यामार्फत सुरु.

१२. हे खरे की, जून २०२५ पुर्वी मी अहमदपूर पंचायत समितीमध्ये कार्यरत कधीही नव्हतो. मी आजरोजी दाखल केलेले अभिलेख हे सार्वजनिक दस्तावेज अधिनियम २००७ मधील कोणत्या तरतुदींनूसार कोणत्या प्रकारचे अभिलेख आहेत, हे मला सांगता येणार नाही. माहिती अधिकारातील आमच्या कार्यालयात आलेल्या अर्जांचे अभिलेख राखून ठेवण्याचा कालावधी किती असता यास माझे सांगणे सदर अर्ज दस्तावेज प्रकार अ, ब, क, ड पैकी कोणत्या प्रकारात येतो हे माहित नसल्याने त्यांचा कालावधी मला सांगता येणार नाही. आमच्या कार्यालयात माहिती अधिकाराखाली आलेल्या कधीपासूनच्या अर्जाचे अभिलेख

उपलब्ध आहेत, हे मला सांगता येणार नाही. सार्वजनिक दस्तावेज अधिनियम, २००७ मधील तरतुदींप्रमाणे आमच्या कार्यालयातील कोणत्या काळाचे नाश केलेले आहेत, याचे रजिस्टर मी आणलेले नाही. ग्रामसेवकांची मासीक डायरी अभिलेखाच्या कोणत्या प्रकारात येते हे मी खात्रीलायक सांगू शकणार नाही. ग्रामसेवकांच्या मासीक डायरीचे अभिलेख आमच्या कार्यालयात कधीपासून उपलब्ध आहे, हे मला सांगता येत नाही. वादी किंवा त्याची पत्नी यांनी माझ्या कार्यकालात कोणताही अर्ज आमच्या कार्यालयात दिलेला नाही. वादींना सही करताना मी कधीही पाहिलेले नाही. आता मला नि.क्र.१०२ दाखवला. सदर अहवाल पंचायत समिती अहमदपूर यांच्याकडून मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना पाठवून प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यावर कारवाई व्हावी म्हणून केलेला आहे, असे तो वाचल्यावर समजते. आता मला नि.क्र.६१ दाखवला. तो तत्कालीन ग्रामसेवक यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या ताब्यातील प्रोसीडींग बुक ग्रामपंचायतीत जमा करुन घ्यावे म्हणून गटविकास अधिकारी यांनी दिलेला आदेश आहे, हे खरे आहे. हे खरे आहे की, ग्रामसेवक माकुरवार हे सध्या पंचायत समिती, अहमदपूर अंतर्गत कार्यरत आहेत. हे खरे की, त्यांचे सेवापुस्तक आमच्या कार्यालयात आहे. नि.क्र.६४ ही नोंद प्रतिवादी क्र.१ यांच्या सेवापुस्तकातील आहे, हे खरे आहे. हे खरे की, नि.क्र.१२८ ते १३६ हे कागद मी स्वत: स्वीकारलेले नाहीत व त्यावर माझी स्वत:ची कोठेही सही नाही. हे खरे की, नि.क्र.१२८ ते १३६ या कागदपत्रांच्या अनुषंगाने मी कोणतीही कायदेशीर कारवाई प्रतिवादींच्याविरुध्द केलेली नाही. नि.क्र.१३५ वर आमच्या कार्यालयाचा उल्लेख किंवा सही शिक्का नाही, हे खरे आहे. हे खरे की, नि.क्र.१३५ हे आमच्या कार्यालयात दाखल केलेले नसल्याने तो आमच्या कार्यालयाच्या अभिलेखाचा भाग नाही. त्यामुळे, नि.क्र.१३५ वर प्रमाणिकीकरण करण्याचा व ती नक्कल देण्याचा मला अधिकार नाही, हे खरे नाही. नि.क्र.१२८ ते १३६ हा

आमच्या अभिलेखाचा भाग नाही, हे खरे नाही. हे खरे नाही की, त्यामुळे असे कागद दाखल करण्याचा मला अधिकार नाही. हे खरे की, माझी वादी व त्याच्या पत्नीसोबत ओळख नाही. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा आमच्या कार्यालयातील कर्मचारी असल्याने त्याच्या हितासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत
समक्ष
स्वाक्षरीत/-

(एस.एन.सरडे)

दिनांक १२/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.